# मोटार अपघात दावा अर्ज क्र.२१३/१५ मधील नि.६ खालील आदेश

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात, या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.२६/१२/२०१४ रोजी रात्री १०.३० वा. चे सुमारास पुणे-सातारा महामार्गावर किकवी, ता.भोर, जि.पुणे गांवचे हद्दीत पार्वती जगन्नाथ साबळे या अपघातातील टाटा इंडिगो कार क्र.एम.एच१४-बी.ए.-४५०० मधून जात असताना समोरुन येणारी सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीची वॉल्हो बस क्र.एम.एच.०४-जी.पी.-०१४३ ही निष्काळजीपणे चालवून टाटा इंडिगो कारला धडक दिली आणि त्यामध्ये पार्वती जगन्नाथ साबळे गंभिररित्या जखमी होवून दवाखान्यात उपचार घेत असताना मयत झाल्या. अपघाताचे वेळी सदरचे वाहन सामनेवाला क्र. १ यांच्या मालकीचे होते आणि या वाहनाचा सामनेवाला क्र.२ नॅशनल इंशुरंस कं. लि. या विमा कंपनीकडे विमा उतरविलेला असल्याने, सामनेवाला क्र.१ व २ हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

३. सामनेवाला क्र.१ यांचे विरुध्द अर्ज एकतर्फा चालला. सामनेवाला क्र.२ यांनी नि.६ वर आपले म्हणणे दिले आहे.

४. अर्जदारांचे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदारांनी यादी (नि.४) सोबत हजर केलेले प्रथम वर्दी अहवाल व घटनास्थळ पंचनामा यावरून अर्जदारांच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहन त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या विमा प्रमाणपत्राची प्रत सकृतदर्शनी असे दर्शविते की, वॉल्हो बस क्र.एम.एच.०४-जी.पी.-०१४३ चा सामनेवाला क्र.२ यांचेकडे सामनेवाला क्र.१ यांनी मालक या नात्याने दिनांक १४/०८/२०१४ ते १३/०८/२०१५ या कालावधीसाठी विमा उतरविलेला होता आणि अपघाताचे दिवशी सदरहू वाहन सामनेवाला क्र.२ यांच्याकडे विमा संरक्षित होते.

६. अर्जदार यांनी हजर केलेले शव विच्छेदन अहवाल आणि मयताचा पंचनामा यावरून असे स्पष्ट होते की, पार्वती जगन्नाथ साबळे यांचा अपघातामध्ये गंभिर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाला क्र.१ व २ हे स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

**: <u>आ दे श</u> :**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ व २ यांनी स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या नुकसान भरपाई म्हणून रक्कम रू.५०,०००/-(रू. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसाचे आत अर्जदार क्र.१ यांना रक्कम रू.३५,०००/-(रू. पस्तीस हजार फक्त) आणि अर्जदार क्र.२ ते ४ यांना प्रत्येकी रुपये ५,०००/- (रू.पाच हजार फक्त) स्वतंत्र रेखांकित धनादेशाने द्यावी. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासुन संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला क्र.१ व २ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा.
दिनांक:०८/१२/२०१५

(एस्. एम्. गव्हाणे)
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.